# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:12.02.2026** **वार:गुरुवार**

---

1. रोजगार निर्मितीसाठी भव्य पायाभूत सुविधा आणि कामगार-केंद्रित क्षेत्रांवर केंद्राचा भर
2. महाराष्ट्रात सध्या दीड लाख कोटी रुपयांचे रेल्वे प्रकल्प प्रगतीपथावर
3. वंदेमातरम गीताच्या सादरीकरणाबाबत केंद्राद्वारे सुधारित निर्देश
4. जालना जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना मदत करणारे सहा शिक्षक निलंबित
5. धर्मभास्कर, शिवकथाकार विजयराव देशमुख यांचं निधन आणि
6. टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेत, काल वेस्टइंडीज, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका विजयी

**सीतारामन**

बंदरांशी थेट संपर्क नसलेल्या राज्यांमध्ये मालवाहतूक आणि वितरण व्यवस्थापनाचा खर्च कमी करण्यासाठी सरकार जलमार्गांवर लक्ष केंद्रित करत असल्याची माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल लोकसभेत दिली. 2026-27 च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर झालेल्या चर्चेला उत्तर देताना त्या बोलत होत्या. सरकार पायाभूत सुविधांमध्ये केवळ रस्ते आणि महामार्गांवरच नव्हे तर जलमार्गांवरही लक्ष केंद्रित करत असून समुद्री बंदरांशी थेट न जोडलेली राज्ये देखील कमी खर्चात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल वाहतूक करू शकणार आहेत असं त्या म्हणाल्या.

सरकारचं  लक्ष कामगार-केंद्रित क्षेत्रांवर आहे. तसंच प्रत्येक जिल्ह्यात पशुवैद्यकीय शल्यचिकित्सक, रुग्णालये आणि चाचणी प्रयोगशाळा यासारख्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पशुसंवर्धन आणि मत्स्यपालनावरही आपण लक्ष केंद्रित करत आहोत.

याशिवाय यंदाच्या कर संकलनात राज्यांचा वाटा 25 लाख 44 हजार कोटी रुपयांचा असेल असंही सीतारामन यांनी सांगितलं.....

**रीजनल मेडिकल हब्स मेडिकल टूरिज्म को बढ़ावा देगा उसके साथ साथ अपॉर्च्युनिटीज इन थे नेक्स्ट फाइव यर्स उस एक स्कीम के द्वारा होने वाले हैं एलाइड हेल्थ प्रोफेशनल के उस ब स्कीम के द्वारा फिर फाइव न्यू इंडस्ट्रियल तो टेक्सटाइल सेक्टर तो लीथर सेक्टर मजोर पार्क्स जो बना रहे हैं उसमें भी उद्योग और जॉब्स होने का संभावना क्लियरली दिखता है।**

राज्यात एक लाख 50 हजार कोटी रुपयांचेरेल्वे प्रकल्प सुरू असल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल लोकसभेत दिली. अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. नाशिकच्या कुंभमेळ्यासाठीही विविध उपाययोजना सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

महाराष्ट्रात रेल्वे विकासाचं काम व्यापक पद्धतीनं सुरू असून यंदा 23 हजार 926 कोटी रुपये देण्यात आले आहेत. यूपीए सरकारच्या काळात ही रक्कम केवळ 1 हजार 100 कोटी रुपये होती. राज्यातील औद्योगिक शहरांना जोडण्यासाठी अनेक नवीन प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत असंही त्यांनी सांगितलं. यावेळी बोलतांना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले.....

**महाराष्ट्र के लिए प्रधानमंत्री जी ने ₹23,926 करोड़ का बजट रेलवे का इस वर्ष के लिए आवंटन किया है जो कि उपा सरकार के समय में मात्र ₹1,100 करोड़ का बजेट मिलता था और भी महाराष्ट्र में कई स्टेशंस के कैपेसिटी को दोगुना करने का काम अभी चल रहा है।**

**संगीतमयर स्ता**

मुंबईचा सागरी किनारी रस्ता देशातला सर्वांत पहिला संगीतमय रस्ता म्हणून ओळखला जाणार आहे. या सागरी किनारी मार्गाच्या उजवीकडील मार्गिकेवर प्रवास करताना संगीत ऐकू येणार आहे. पहिल्या टप्प्यात या रस्त्यावर 500 मीटर लांब विशेष संगीतमय पट्ट्या बसविण्यात आल्या असून प्रति तास 60 ते 70 किलोमीटर गतीनं जाणाऱ्या वाहनाच्या चाकांच्या घर्षणातून स्वरांची निर्मिती होईल अशी ही संकल्पना आहे.

**वॉका-वंदेमातरम**

केंद्र सरकारनं वंदे मातरम गीताच्या सादरीकरणासाठी अधिकृत नियमावली स्थापित करण्याकरिता नवीन व्यापक मार्गदर्शक तत्त्वं काल जारी केली. सरकारी कार्यक्रमांमध्ये ते कसं आणि केव्हा सादर करावं आणि त्यावेळी उपस्थितांनी काय पालन करावं ते यात स्पष्ट केलं आहे. एक वृत्तांत, माझे सहकारी राजेंद्र लेले यांच्याकडून.....

**या मार्गदर्शक तत्वांनुसार, सहा कडव्यांचा समावेश असलेलं आणि सुमारे 3 मिनिटे आणि 10 सेकंद कालावधीच्या वंदे मातरम या गीताची संपूर्ण अधिकृत आवृत्ती प्रमुख राज्य कार्यक्रमांच्या प्रसंगी सादर केली पाहिजे किंवा वाजवली पाहिजे. यामध्ये राष्ट्रध्वज आरोहण, राष्ट्रपती आणि राज्यपालांचं औपचारिक आगमन आणि प्रस्थान समारंभ आणि अशासारख्या समारंभांमध्ये-त्यांच्या नियोजित भाषणांपूर्वी आणि नंतर-अशा प्रसंगांचा समावेश आहे. वंदे मातरम आणि राष्ट्रगीत दोन्ही कार्यक्रमांचा भाग असतात, तेव्हा राष्ट्रगीतापूर्वी वंदेमातरम सादर केलं पाहिजे. या दोन्ही सादरीकरणावेळी उपस्थितांनी लक्षपूर्वक उभं राहणं अपेक्षित आहे.**
**गृह मंत्रालयानं शैक्षणिक संस्थांना दैनंदिन शालेय संमेलनांमध्ये आणि महत्त्वाच्या संस्थात्मक कार्यक्रमांमध्ये वंदे मातरम गायनाला प्रोत्साहन देण्याचं आवाहन केलं आहे. विद्यार्थी आणि सामान्य लोकांमध्ये या राष्ट्रीय प्रतीकांबद्दल जागरूकता आणि आदर निर्माण करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आलं आहे.**

**नवनियुक्त महापौर**

मुंबईचे महापौर, उपमहापौर आणि पदाधिकारी सामान्य मुंबईकरांचं स्वप्न पूर्ण करतील अशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. बृहन्मुंबई महापालिकेच्या महापौरपदी नगरसेविका रितू तावडे आणि उपमहापौरपदी संजय घाडी यांची निवड झाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल या दोघांचंही पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केलं.

ठाणे महानगरपालिकेचे महापौर म्हणून शिवसेनेच्या शर्मिला पिंपळोलकर तर उप-महापौर म्हणून भाजपाचे कृष्णा पाटील यांनी काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पदभार स्विकारला.

**प्राध्यापक भरती**

सार्वजनिक विद्यापीठांमधील अध्यापक भरतीची संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक व्हावी, यासाठी उमेदवारांना मिळालेल्या गुणदानाची यादी त्यांच्या गुणांसह विद्यापीठांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केली जाणार आहे. अशा विविध अनुषंगिक नाविन्यपूर्ण बदलांचा समावेश करून भरतीची सविस्तर कार्यपद्धती जाहीर करून भरती प्रक्रियेला मान्यता देण्यात आल्याची माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

यामुळे सहाय्यक प्राध्यापक पदासाठी तासिका तत्वावरील, कंत्राटी तसेच ॲडहॉक तत्वावर कार्यरत असणाऱ्या सहाय्यक प्राध्यापकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या कालावधीत केलेल्या कामाचा अनुभव ग्राह्य धरला जाणार आहे.

अनेक सहाय्यक प्राध्यापक जे वर्षानुवर्षे तासिका, कंत्राटी आणि ॲडहॉक तत्वावर काम करतात अशांचा अनुभव पात्रतेसाठी ग्राह्य धरला जाणार आहे.

**कॉपी-जालना**

जालना जिल्ह्यात इयत्ता बारावी परीक्षेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांकडे उत्तराच्या नक्कला आढळून आल्यानंतर सहा शिक्षकांना तडकाफडकी निलंबित करण्याचे आदेश माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात यांनी काल दिले. बारावीच्या परीक्षेत नक्कल करणाऱ्या विद्यार्थ्यांना सहकार्य करणाऱ्या शिक्षकांवरही कार्यवाही केली जाईल, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले होते.

**निधन-वानखेडे-नागपुर**

परमपूज्य सद्गुरुदास महाराज, शिवकथाकार विजयराव देशमुख यांचं काल सायंकाळी नागपुरात हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं. ते 84 वर्षांचे होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचं चरित्र तळागाळात पोहोचविण्यासाठी विजयराव देशमुख संपूर्ण आयुष्य व्यतित केलं अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. विजयराव देशमुशं यांच्या निधनानं समाजाला दिशा देणारा महान मार्गदर्शक हरपला अशा शब्दांत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या सामन्यांच्या आयसीसी विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत काल वेस्ट इंडीजच्या संघानं इंग्लंडच्या संघावर 30 धावांनी विजय मिळवला. ब गटातल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं आयर्लंडवर 67 धावांनी विजय मिळवला. तिसऱ्या सामन्यात वीस षटकांत दक्षिण अफ्रिका आणि अफगाणिस्तानची धावसंख्या समान झाल्यामुळे नियमानुसार सामन्याच्या निर्णयासाठी दोन अतिरिक्त षटकं खेळली गेली. यात दक्षिण अफ्रिकेनं  4 धावांनी विजय मिळवला.

**हवामान-**

राज्यात आज सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.